कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्रि क्रमांक 1064

कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252

:: प्रेस नोट ::

दिनांक :- 27.01.2020.

**पोलीस ठाणे बदनापूर ता.बदनापूर जि. जालना येथील श्री. गणेश बाबूराव सूरवसे वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी कर निर्धारक नगर पंचायत बदनापूर जि.जालना यांना 20,000/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | गणेश बाबूराव सूरवसे वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी कर निर्धारक नगर पंचायत बदनापूर जि.जालना |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 27/01/2020 रोजी नगर पंचायत बदनापूर जि.जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 20,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 06/01/2020 रोजी तक्रार दिली की, मी नगर पंचायत कार्यालय बदनापूर मध्ये बिअर शॉपी (flbr-2) च्या नाहरकत प्रमाणपत्र मिळविणेसाठी अर्ज केला असता सदर कार्यालयातील कर्मचारी गणेश बाबूराव सूरवसे यांनी 35,000/- रूपयांची मागणी करुन तडजोडी अंती 20,000/- रूपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 27/01/2020 रोजी लोकसेवक श्री.गणेश सुरवसे यांनी पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने नगर पंचायत बदनापूर येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक गणेश बाबूराव सूरवसे वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी कर निर्धारक नगर पंचायत बदनापूर जि.जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

( एस.एस.ताटे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.